**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्र. १३**
**(ऑनलाईन)**

विषय क्रमांक-२०६ शुक्रवार दिनांक-११/०३/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०२१-२०२२ चे सुधारित व सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेस सादर करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका अर्थ विभाग जा.नं.१६३२ दि.०४/०३/२०२२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९५ नुसार सन २०२१-२०२२ चे सुधारित व सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. तरी अंदाजपत्रकाचा विषय मा.स्थायी समिती सभेत घेणे यावा. ही विनंती.

येणेप्रमाणे मा.आयुक्त साहेब यांचे पत्र

यावर मा.नगरसचिव श्री. तडवी यांचा अभिप्राय की, श्री. भुसारे , स्वीय सहाय्यक मा. सभापती साहेब यांचे निदर्शनास आणून दयावे व तारीख व वेळ घ्यावी.

मा.सभापती साहेब यांचा अभिप्राय की, अर्थसंकल्पीय सभा दिनांक ११/०३/२०२२ रोजी सकाळी ११.३० वा. आयोजीत करण्यात यावी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- आज दि.११/०३/२०२२ रोजीची अर्थसंकल्पीय सभा महानगरपालिका कामगार युनीयने कामगारांना सातवा वेतन आयोग लागू करणे व इतर मागण्यांकरीता धरणे आंदोलन असल्याने सभा दोन तासा करीता तहकुब करण्यात येत आहे.

**सकाळी ११.३० वा तहकुब केलेली सभा दुपारी १.३० वा.सभा सुरू.**

मा.आयुक्तसाहेब अहमदनगर महानगरपालिकेचा अर्थसंकल्प मा.स्थायी समितीस सादर करतील.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन-२०२२-२०२३चे ८०२ कोटी मुळ अंदाजपत्रक दि.११/०३/२०२२ रोजी मा.स्थायी समिती सभापती मा.श्री.कुमार वाकळे यांचेकडे मा.आयुक्त श्री. शंकर गोरे यांनी सादर केले.

**मा.आयुक्त साहेब अर्थसंकल्पावरील आपले मनोगत व्यक्त करतील.**

मा.आयुक्त साहेब :- सादर केलेल्या अंदाजपत्रकात महसुली उत्पन्न रू.३७३ कोटी ९१ लाख, भांडवली जमा रू.३७२ कोटी ०४ लाख धरणेत आले आहे. महसुली उत्पन्नात संकलीत करापोटी रू.५१ कोटी २२ लाख, संकलीत करावर आधारीत करापोटी ६७ कोटी २१ लाख, जी.एस.टी. अनुदान १११ कोटी ६७ लाख व इतर महसुली अनुदान रू.२७ कोटी ६५ लाख , गाळा भाडे ३ कोटी, पाणीपटटी २६ कोटी ४० लाख , मिटरद्वारे पाणी पुरवठा पोटी ४२ कोटी, संर्कीण २४ कोटी ८० लाख इ. महत्वाच्या आहेत.तसेच भांडवली कामांवर अनुदान, कर्ज व मनपा हिस्सा धरून रू.३७२ कोटी ०४ लाख अंदाजित जमा होणार आहेत.

तसेच खर्च बाजूस वेतन, भत्ते व मानधनावर १२६ कोटी ३६ लाख , पेन्शन ४२ कोटी ७७ लाख, पाणी पुरवठा विज बील ३३ कोटी, स्ट्रीट लाईट विज बील ३ कोटी , शिक्षण मंडळ वर्गणी ४ कोटी ३० लाख, महिला व बाल कल्याण योजना १ काटी ६० लाख , अपंग पुनर्वसन योजना १ कोटी ६० लाख ,

मागासवीय कल्याणकारी योजना ५ कोटी २५ लाख, मा.सदस्य मानधन १ कोटी ५० लाख, औषधे व उपकरणे १ कोटी, मा.सदस्य प्रभाग स्वेच्छनिधी ७ कोटी ४७ लाख , कचरा संकलन व वाहतूक ३ कोटी, पाणी पुरवठा साहित्य खरेदी व दुरूस्ती ६० लाख, टँकरद्वारे पाणी पुरवठा व तुरटी, ब्लिचिंग पावडर खरेदी १ कोटी ७२ लाख, अशुध्द पाणी आकार २ कोटी, विविध वाहने खरेदी २ कोटी ३० , नविन रस्ते १५ कोटी , रस्ते दुरूस्ती १२ कोटी, इमारत दुरूस्ती ५० लाख, शहरातील ओढ नाले साफसफाई ४५ लाख, आपत्कालीन व्यवस्थापन ४० लाख, कोंडवाडयावरील खर्च २० लाख, वृक्षारोपन तदनुषंगिक खर्च ८० लाख, हिवताप प्रतिबंधक योजना ४० लाख, कचरा डेपो सुधारणा व प्रकल्प उभारणी ४१ लाख, मोकाट कुत्री व जनावरे बंदोबस्त १ कोटी ३५ लाख यासह इतर बाबींवर खर्च करण्यात येणार आहे.

शहरवासियांना चांगल्या दर्जाचे रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी नविन रस्ते व रस्ते दुरूस्तीसाठी मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.तसेच आरोग्य,वीज,पाणी या सेवा चांगल्या दर्जाच्या देण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.मा.शासनाकडून प्राप्त विविध कामांसाठीच्या निधीतील कामे पूर्णत्वास नेणे व नविन कामांसाठी मा.शासन निधी मिळविणे,मनपा हिस्याची रक्कम भरणे इ.कामे तसेच घनकचरा संदर्भातील कामे ,चितळे रोड भाजी मार्केट जागा विकसीत करणे,नाटयगृहाचे बांधकाम पूर्ण करणे,मिटरव्दारे पाणी पुरवठा,शहर स्वच्छता अभियान,गतिशिल प्रशासन,तसेच शहर व उपनगरा मधील भागांचा विकास करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

अमृत भुयारी गटर योजना एस.टी.पी.प्लॉन्ट सिव्हील वर्कचे काम पुर्ण झाले आहे.मशिनरी आल्या आहेत.पाईपच्या मंजूरीचा प्रस्ताव एस.एल टी.सी. कडे पाठविला आहे.दोन्ही प्रकल्प पाच ते सहा महिन्यामध्ये पुर्ण करण्याच्या प्रयत्न आहे. रस्ते दुरूस्ती करीता २७ कोटींची तरतुद करण्यात आली आहे.सोलर प्रकल्प कार्यान्वीत करावयाचा आहे.सोलर प्रकल्पातुन लाईट बील कसे कमी करता येईल ते पहाणार आहोत.नाटयगृहासाठी निधी प्राप्त झाला आहे.त्याचे बरेचसे काम पुर्ण झाले आहे.जुन पर्यत काम पुर्ण करावे लागणार आहे.जिल्हा नियोजन कडून हॉस्पीटलच्या प्रस्तावाला मंजूरी मिळाली आहे.त्याचे दोन ते तीन दिवसामध्ये टेंडर निघणार आहे.बुरूडगांव येथे नियोजीत आहे.माझी वसुंधरा जिल्हा वार्षीक योजनेतील निधीची तरतुद केली आहे.नेहरू मार्केट च्या ठिकाणी नविन शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारणी करीता नविन आर्कीटेक यांनी नियुक्ती केली आहे.चालू वर्षात विशेष भर काही बाबींवर देण्यात येणार आहे.या मध्ये मनपाच्या शाळांमध्ये दर्जेदार सुविधा मिळण्याच्या दृष्टीने एक शाळा डिजीटल करण्याचे नियोजन केले आहे.घरपट्टीचे ऑनलाईन सॉफ्टवेअर सध्या आपण वापरतो. .त्याच प्रमाणे महानगरपालिकेतील इतर कामकाज ऑनलाईन करण्याचा प्रयत्न करणार आहोत.मागील वर्षातील फेज -२ मधील पेंडींग कामे पुर्ण करण्यात आली आहे.२५ ते ३० गॅप सोडलेतर बरेचसे काम पुर्ण झाले आहे.मुळा धरणातुन पुरवठा होणा-या विळद येथे येणा-या पाण्याचे मोजमापासाठी मिटर बसविण्यात आले आहे.विळद पंपीग स्टेशन येथून पाणी उचलण्यासाठी कोणतीही तरतुद केलेली नव्हती.पंप हाउस बांधण्याचे काम झाले आहे.पाण्याचा स्त्रेत वाढविण्याबरोबरच वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत.केंद्र शासनाच्या अमृत -२ मध्ये या नियोजनाचा आराखडा तयार करण्यात येणार आहे.शहराच्या पाण्याच्या लाईन मॅप वर घेवून डिजीटलायजेशन करून जी.पी.एस.सिस्टमला जोडून कुटर सर्व्हे करणे चे काम करण्यासाठी एका एजन्सीची नियुक्ती करण्यासाठी मा.स्थायी समिती कडे प्रस्ताव सादर केला आहे.केंद्र सरकार डी.पी.आर.साठी निधी देणार आहे.डी.पी.आर .केंद्र सरकारला सादर केल्या नंतर निधी प्राप्त होणार आहे.पाणी पुरवठा व्यवस्थेतील

त्रुटी दुर करण्याचा प्रयत्न करत आहोत.असा हा ८०२ कोटींचा अर्थसंकल्प आज स्थायी समितीकडे सादर केला आहे.

**या नंतर मा.सभापती आपले मनोगत व्यक्त करतील.**

मा.सभापती साहेब :- मा.आयुक्त साहेब यांचा प्रशासकिय सेवेतील प्रदिर्घ अनुभव असून या अनुभवाचा शहरविकासाच्या बाबतीत ते सकारात्मक निर्णय घेतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.तसेच मा.आयुक्त साहेबांना मी विनंती करतो की,त्यांनी या सभेमध्ये संपुर्ण अंर्थसंकल्पीय कामकाजामध्ये सहभाग घेवून सभा संपेपर्यत उपस्थित राहून आम्हाला मार्गदर्शन करावे.

उपस्थित सर्व मा.स्थायी समिती सदस्य, महानगरपालिकेचे सर्व विभाग प्रमुख व अधिकारी, पत्रकार बंधु व उपस्थित सर्वांचे हार्दिक स्वागत करतो.नुकतीच माझी मा.स्थायी समितीच्या सभापती माझी निवड झाली आहे.कालची सभा झाल्यानंतर लगेचच प्रशासनाने स्थायी समिती मध्ये अर्थसंकल्प सादर करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला त्यानुसार आजची अर्थसंकल्पावरील सभा आयोजीत करण्यात आलेली आहे.प्रत्येक संस्थेमध्ये अर्थसंकल्प अत्यंत महात्वाचा भाग असून या माध्यमातुन शहराच्या प्रगतीचा आलेख आपल्याला उंचावण्याची संधी आहे.नुकत्याच झालेल्या निवडीने माझ्यावर शहर विकासाची मोठी जबाबदारी टाकण्यात आली आहे.

सर्व स्थायी समिती सदस्य व अधिकारी यांच्या सहकार्यातुन आपण सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पाचे स्वागत करून,अर्थसंकल्पामध्ये समाविष्ठ करण्यात आलेल्या योजना तसेच शहराच्या सर्वागीन विकास करण्याकरीता आपण मला सहकार्य कराल अशी खात्री बाळगतो.

मा.श्री.गणेश कवडे :- मा.सभापती साहेब आज सादर झालेल्या अर्थसंकल्पाचा अभ्यास करण्याकरिता सभा तहकुब करण्यात यावी.व सोमवार दि.१४ /०३/२०२२ रोजी सकाळी ११.३० वा. सभा घेण्यात यावी.

मा.श्री.सचिन शिंदे :- मा.श्री.गणेश कवडे साहेब यांनी मांडलेल्या सुचनेस अनुमोदन देत आहे.

मा.सभापती साहेब :- महानगरपलिकेचे सन २०२२-२३ या वर्षाचे अंदाजपत्रक आपल्या अहमदनगर महानगरपालिकेचे आयुक्त साहेब यांनी सादर केले आहे.अंदाजपत्रकाची माहिती दिली आहे.त्यावर मा.श्री. गणेश कवडे व सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे चर्चा करण्यासाठी सोमवार दि. १४/०३/२०२२ रोजी सकाळी ११.३० वा. सभा पुढे सुरू होईल.सर्व खाते प्रमुख व शाखा प्रमुख यांनी सभे करीता आवश्यक त्या माहितीसह सभेस उपस्थित रहावे.

***_*_*_*_*_**

**सोमवार दि. १४/०३/२०२२ रोजी तहकुब सभा आज मंगळवार दिनांक १५/०३/२०२२ रोजी सकाळी ११.३० वा.सुरूझाली.**

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेच्या कामगारांनी सातवा वेतन आयोग लागु करणे व इतर मागण्या करीता धरणे अंदोलन गेल्या काही दिवासांपासून सुरू केले आहे.महानगरपालिका कामगारांनी पुकारलेल्या अंदोलनास स्थायी समिती चा पाठिंबा असल्याने आजची सभा तहकुब करण्यात येत आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- आज महानगरपालिका कागगार युनियने पुकारलेल्या अंदोलनास स्थायी समितीचा पाठिंबा देत असल्याने आजची सभा तहकुब करण्यात यावी.ही तहकुब करण्यात आलेली सभा उदया दिनांक १५/०३/२०२२ रोजी सकाळी ११.३० वा.घेण्यात यावी.

मा.श्री.गणेश कवडे :- मा.श्री.मुदस्सर शेख यांनी मांडेलेल्या सुचनेस मी अनुमोदान देत आहे.

मा.सभापती साहेब :- आज तहकुब केलेली सभा उदया दिनांक १५/०३/२०२२ रोजी सकाळी ११.३० वा.घेण्यात येईल.माझी प्रशासनास विनंती आहे की,कामगारांचे प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यात यावेत..

**सोमवार दि. १४/०३/२०२२ रोजी तहकुब केलेली सभा आज मंगळवार दिनांक १५/०३/२०२२ रोजी सकाळी ११.३० वा.सुरूझाली.**

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- आपल्या सर्वांच्या मनात राष्ट्र भक्तीची भावना जागृत व्हावी यासाठी सभेची सुरुवात राष्ट्रगीताने व्हावी.अशी माझी इच्छा आहे.याबाबत प्रशासनाने माहिती दयावी.

अतिरीक्त आयुक्त मा.श्री.पठारे साहेब :- तसे लेखी नोंद कोठे ही नाही.सभेने निर्णय घावा.

मा.सभापती साहेब :- मा.महासभेची सुरूवात ज्या प्रमाणे राष्ट्रगीताने होते ,त्याच पध्दतीने सर्वाचे सहमतीने झालेल्या चर्चे नुसार यापुढे प्रत्येक सभेची सुरूवात राष्ट्रगीताने व समारोप वंदे मातरम ने करण्याची नविन सुरूवात आज पासून सुरू करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**त्यानुसार सभेची सुरूवात राष्ट्रगीताने झाली.**

मा.सभापती साहेब :- तहकुब सभा सुरु करण्यात यावी.

दिनांक ११/०३/२०२०२२ रोजी मा.आयुक्त साहेब यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पा नुसार प्रत्येक लेखाशिर्ष निहाय वाचन करण्यात यावे.

अर्थविभाग श्री.अनिल लोंढे यांनी लेखाशिर्षानुसार वाचनास सुरूवात केली.

महसुली जमा बाजु पान नं.३

मा.सभापती साहेब :- मोबाईल टॉवर शास्ती आकारणी बाबत माहिती सांगा.

मुल्य निर्धारण तथा कर संकलन अधिकारी श्री.चाफे :- मोबाईल टॉवर वर २ % शास्ती लावण्यात येते.

मा.सभापती साहेब :- शास्ती म्हणजे काय ?

मुल्य निर्धारण तथा कर संकलन अधिकारी श्री.चाफे :- दंड व शास्ती एकच आहे.एप्रिल,मे,जुन नंतर जे कर भरत नाही.त्यांना शास्ती लावण्यात येते.

अतिरीक्त आयुक्त मा.श्री.पठारे साहेब :- वसुली पुरती शास्ती राहील.इतर विभागास दंड राहिल.

मा.सभापती साहेब :- पावती मध्ये दंड व शास्ती असते.

मुल्य निर्धारण तथा कर संकलन अधिकारी श्री.चाफे :- मा.आयुक्त साहेबांना शास्ती माफ करण्याचा अधिकार आहे.

मा.सभापती साहेब :- रिव्हीजन करणे करीता सध्या ई - निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे.ठेकेदार संस्थेकडून रिव्हीजन पुर्ण झाल्यावर म.न.पा हद्दीमधील ज्या मालमत्ता धारकांना कर आकारणी झालेली नाही. त्या सर्व मालमत्ता धारकांना कराची नव्याने आकारणी होणार असल्याने या करामध्ये तीन टक्के वाढ होईल.त्यानुसार या करामध्ये तीन टक्के वाढ करण्यात यावी.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- जाहिरात करामध्ये काय समाविष्ठ आहे.

जाहीरात विभाग श्री.देशमुख सुबोध :- सन २०१७ मध्ये जी.एस.टी.लागु झाल्या मुळे जाहिरात कर त्यामध्ये वर्ग झाला.मंत्रालयातुन पत्र आले होते.उत्पन्नाचे साधन म्हणून ठेवले होते.१ ऑगस्ट पासून जाहिरात कर घेणे बंद केले आहे.आता काहीच घेत नाही.पालिका हद्दीतील जागा भाडे फक्त घेण्यात येते.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- खाजगी बोर्डवर काही कर लावत नाही का?

मा.उपायुक्त श्री.डांगे :- जी.एस.टी.मध्ये जाहिरात कर समावीष्ठ केला. त्यामुळे जाहिरात कर वसुल केला जात नाही.मा.आ.विकास ठाकरे यांनी या संदर्भात पत्र दिले आहे.

मा.सभापती साहेब :- जाहीरात बोर्ड कोणकोणत्या जागेवर आहेत.या बाबतची माहिती सांगा.

श्री.सुबोध देशमुख जाहिरात कर विभाग :- म.न.पा.जागेवरील जाहिरात बोर्डची यादी वाचन केली.

मा.सभापती साहेब :- जिल्हा रूग्णालय कंम्पौड येथील जाहिरात बोर्ड लावलेली जागा महानगरपालिकेची आहे का?

श्री.सुबोध देशमुख जाहिरात कर विभाग :- रस्त्याच्या कडेची जागा आपल्या हद्दीत आहे.

मा.सभापती साहेब :- खाजगी जागेमध्ये किती लांबी चे बोर्ड लावण्यास परवानगी आहे.

सुबोध देशमुख जाहिरात कर विभाग :- खाजगी जागेमध्ये ४०X२० फुट लांबीचे बोर्ड लावता येतात.एकुण ७१ बोर्ड आहेत.तांत्रिक कारणामुळे बरेचसे बोर्ड लावता आलेले नाही.

मा.श्री.रविंद्र बारस्कर:- तुम्ही जी ४०X२०साईज सांगीतली तेव्हढयाच साईज बोर्ड आहेत का? काही जास्त साईजचे आहेत,ते पहा.

मा.सभापती साहेबः- प्रेमदान चौकाती बोर्ड मुळे विद्रुपी करण झाले आहे.हॉटेल समोर आहे तो जर मोठा असेल तर तो बोर्ड काढुन घ्या.

श्री.सुबोध देशमुख :- अजुन ३ महिने मुदत आहे.त्यानंतर काढु

मा.श्री.गणेश कवडे :- घरपट्टी लावतांना कमर्शीयल भाडे आकारता, खाजगी जागेतील बोर्ड वाल्याकडून काहीच घेत नाही.

मा.श्री.विनीत पाऊलबुधे :- घरपट्टी घेतांना मोकळया जागेचा कर्मशियल वापर केला तर कर्मशियल दराने ने घरपट्टी आकारतो का ? खाजगी ओपन पेस मध्ये ओनर बोर्ड लावत असेल तर कर्मशियल पट्टी त्या जागेला आकारली पाहिजे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- कर्मशियल घरपट्टी आकारली पाहिजे.

मुल्य निर्धारण तथा कर संकलन अधिकारी श्री.चाफे :- रेग्युलर ओपन प्लॉटची लावतो. धोरण ठरवा.

मा.श्री.गणेश कवडे,मा.श्री.मुदस्सर शेख :- व्यवसाय करणाराला व्यवसायिक आकारणी करता येईल.धोरण ठरविण्याची आवश्यकता नाही.कायदयातील तरतुदी नुसार मागील ६ वर्षाची आकारणी करा.

मा.श्री.विनीत पाऊलबुधे :- जे खाजगी जागेत ,संस्थांच्या जागेतील बोर्ड शोधून त्यांच्यावर मागील ६ वर्षाची कर्मशियल आकारणी करा. कोणताही मार्ग काढु नये अशी सर्वाची भावना आहे.

मुल्य निर्धारण तथा कर संकलन अधिकारी श्री.चाफे :- आकारणी करतो.

मा.श्री.मुदस्सर शेख :- जाहिरात बोर्डला किती स्ट्रक्चरला परवानगी दिली आहे.

सहाय्यक संचालक नगररचकार श्री.चारठाणकर :- स्ट्रक्चरला परवानगी देत नाही.

मा.श्री.विनीत पाऊलबुधे :- मोबाईल टॉवर प्रमाणे टॅक्स लावतो का?

मुल्य निर्धारण तथा कर संकलन अधिकारी श्री.चाफे :- ज्या मिळकती मध्ये टॉवर लावला जातो. त्यावर भाडे कराराम्यानुसार आकारतो. करारानुसार भाडे लावतो.

मा.श्री.विनीत पाऊलबुधे :- ब-याच कंपन्या एकाच टॉवरवर विविध कंपन्यांची प्रसार उपकरणे वापरतात.एका टॉवरवर जितक्या कंपन्या असतील त्या प्रत्येक कंपन्याला टॅक्स लावावा.करारनाम्यात याचा उल्लेख बंधन कारक करण्यात यावे.यावर निगराणीसाठी महानगरपालिकेने यत्रंणा उभारावी.अनाधिकृत टॉवर आहेत का?

मुल्य निर्धारण तथा कर संकलन अधिकारी श्री.चाफे :- अनाधिकृत टॉवर दंड आकारून नगररचना विभागाकडून अधिकृत केले जातात.नगररचना विभागाकडून १६० मंजुर आहेत.अनाधिकृत २२६ आहेत.अजुन कंपनीने दाखल केलेले नाही.

मा.श्री.विनीत पाऊलबुधे :- शहरामध्ये जे इलेक्ट्रीक पोलवर अनेक बोर्ड लावले जातात.याचा टॅक्स घेतला जातो का?

जाहिरात विभाग श्री. सुबोध देशमुख :- भाडे घेतो प्रति पोल ३०० रु. भाडे घेत होतो. मध्यतंरी इलेक्ट्रीक विभागाने पथदिवे वसविण्याचे काम नाशिकच्या संस्थेला टेंडर दिल्याने आपण आता भाडे घेत नाही.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- पथदिवे वसविण्याचे काम नाशिकच्या संस्थेला देण्यात आले आहे.करारनाम्या नुसार त्यांच्या कडून प्रति पोल४०० रु.भाडे घेण्यात येते.

मा.श्री.सभापती साहेब :- तुम्ही माहिती दिली त्यापेक्षा टॉवर ची संख्या जास्त आहे.अ अनाधिकृत टॉवर कमीत कमी रेग्युलर करुन घ्या,

मा.श्री.गणेश कवडे :- प्रत्येक नगरसेवकाला मोबाईल टॉवरची यादी द्या.जास्तीत जास्त उत्पन्न मिळेल.

मुल्य निर्धारण तथा कर संकलन अधिकारी श्री.चाफे :- ठिक आहे.

उपायुक्त श्री.डांगे :- रिव्हीजन करण्याचे नियोजन आहे.त्यात सर्व येईल.

मा.श्री.सभापती सभापती :- लगेच रेग्युलाईज करुन घ्या मनपाचे उत्पन्न वाढेल चारठाणकर यांनी लवकर परवानग्या देव्यात.

मुल्य निर्धारण तथा कर संकलन अधिकारी श्री.चाफे :- २३२ टॉवर पैकी १०६ अधिकृत आहे.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- टॉवरवर जेव्हढया कंपन्या लावल्या तेवढया प्रत्येक कंपनीकडून टॅक्स भरून घ्यायचा, त्यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल.आकारणी मध्ये तसे कलम टाकण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- ज्यांच्याकडे मोबाईल चे टॉवर आहे.त्यांनाच आपण टॅक्स वाढवू ,असे चालते का?भाडेकरी गणक आहे.आपण आपले गणक लावले पाहिजे ,कमीत कमी मोबाईल टॉवर पुरते स्वतंत्र करता येईल का?

मा.श्री.रविंद्र बारस्कर : इतर महानगरपालिकेकडून मोबाईल टॉवरची कशा प्रकारे आकारणी केली जाते या बाबतची माहिती घेवून त्या नुसार आपल्या कडे आकरणी करा.

मा.सभापती साहेब :- माबाईल टॉवरचे भाडयाने उत्पन्नाचे बाबतीत इतर मनपा कडून माहिती घेवू.गणक कोणते लावले ते पाहू.

उपायुक्त श्री.डांगे :- एक केस चा अभ्यास करून सभे पुढे ठेवू.

मा.सभापती साहेब :- भाडे करारनामा याची स्टॅम्प डयुटी भरून व उप-निबंधकाकडे रजिष्टर असलेला करारनामा ग्राहय धरावा. करार हा रजिष्टर असला पाहिजे,नोटरी कडील करारनामा ग्राहय धरण्यातत येवू नये.

मा.श्री.विनित पाअुलबुधे :- ज्या मोबाईल टॉवरच्या नोंदी नाही, असे मोबालईल टॉवर सील करा.ज्यांची नोंद केलेली नाही ते पण शोंधून त्यांना रेग्युलाईज होत असेल तर ते करा. अनाधिकृत मोबाईल धारकांना नोटीस दया.त्यांचे भाडे करार रजिष्टर पाहिजे.कंपनी वाईज आकारणी करा.

मा.सभापती साहेब :- म.न.पा.हद्दीतील मालमत्ता कर आकारणी करीता टेंडर देणार आहे.त्या मध्ये मोबाईल टॉवर आकरणी करणे बाबत समाविष्ठ करा.सदरच्या ठेकेदाराबरोबर तसे ऑग्रीमेंट करा.ते स्थायी समिती सभे समोर ठेवा.तसेच शहर हद्दीमधील नागरी वस्तींमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे.मालमत्ता खरेदीविक्रिच्या व्यवहारांमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत असल्याने या लेखाशिर्षामध्ये रक्कम रूपये १ कोटीने वाढ करण्यात यावी.तसेच मागील तीन वर्षा मधील उत्पन्न पहाता या लेखाशिर्षा मध्ये रू.२ कोटींनी वाढ सुचविण्यात येत आहे

पान नं.४ अग्निशमन विभाग

**अर्थ विभाग श्री.अनिल लोंढे यांनी लेखाशिर्षासह तरतुदींचे वाचन केले.**

मा.सभापती साहेब :- ना हरकत प्रमाणपत्र नुतनीकरण उत्पन्न १ लाख ५० हजार दाखविले आहे.मागील वर्षीचे उत्पन्न ४८ हजार दाखविले आहे.एका बिल्डींग कडून किती रक्कम आकारण्यात येते,फायर ऑडीट करण्यात येते का ?

अग्निशमन विभाग श्री.कार्ले :- खाजगी संस्थेमार्फत ऑडीट केले जाते.एक वर्षाची मुदत असते.शहरात ५०० व शहराच्या बाहेर रू.१०००/- आकारणी केली जाते.

मा.सभापती साहेब :- रू.५००/- दर कोणी लावले.

अग्निशमन विभाग श्री.कार्ले :- माझी पहिलीच मिटींग आहे.अग्निशमन विभाग प्रमुख रजेवर असल्याने.मी उपस्थीत आहे.माहिती घेवून सांगतो.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- प्रत्येक इमारतीला फायर ऑडीत बंधनकारक केले पाहिजे.त्यामुळे मनपाचे उत्पन्न वाढेल,घर असो किंवा बंगाला असो, फायर ऑडीट झाले पाहिजे.

अग्निशमन विभाग श्री.कार्ले :- कायदयात तरतुद नाही.

सहाय्यक संचालक नगररचना श्री.चारठाणकर :- १५ मीटर पर्यत कंम्पलसरी नाही.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- त्या माध्यमातुन आपल्याला उत्पन्न मिळेल.

अग्निशमन विभाग श्री.कार्ले :- व्यावसायीक इमारतींना जी-१ पासून घेतो.

मा.सभापती साहेब :- हॉस्पीटल इमारतींना एन.ओ.सी.देतांना किती रक्कम आकाण्यात येते.

अग्निशमन विभाग श्री.कार्ले :- बांधकाम एरीया उंचीनुसर आपण आकारणी करतो.मिसाळ साहेब दि.२८ पासुन रजेवर आहेत.त्यांना उदया बोलावतो.

मा.उपायुक्त (कर) श्री.डांगे :- इमारतीच्या प्रकारावर एकच वार्षीक रक्कम घेण्यात येते.

मा.सभापती साहेब :- **म**.न.पा.हद्दीमध्ये गॅस कंपनी मार्फत घरगुती गॅस पाईप लाईन टाकण्याचे काम लवकरच सुरू होणार असल्याने तसेच केबल टाकणे, पाण्याची लाईन टाकणे व दुरूस्त करणे, ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती करता रस्ता फोडणे करिता शुल्क आकारले जाते. प्रभाग अधिकारी तसेच स्वच्छता निरीक्षक यांनी पहाणी करून महसुल वाढविणे करता प्रयत्न करावेत.या लेखाशिर्षा मध्ये ३ कोटी रूपयांनी वाढ करण्यात यावी.तसेच अतिरिक्त चटई क्षेत्र या लेखाशिर्षामध्ये रक्कम रू.१ कोटींनी वाढ करण्यात यावी,विकास भार निधीतुन खर्च या लेखाशिर्षा अंतर्गत १ कोटी ५० लाखांनी वाढ करण्यात यावी. रेखांकन मधील अंतर्गत सुधाराणा(ले आउट धारक) या लेखाशिर्षा मध्ये १ कोटींची वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- करांमध्ये वाढ करायचे कोणाच्या हातात आहे.

मा.आयुक्त साहेब :- मा.स्थायी समिती ने महासभेकडे प्रस्ताव करवाढीचा पाठविला परंतु महासभा झाली नाही.कायदयातील तरतुदी नुसार कर - दर वाढीचे प्रस्ताव १९ फेबुवारी च्या आत मंजूर करणे आवश्यक आहे.

मा.सभापती साहेब :- हॉस्पीटल,शॉपींग मॉल,हॉटेल यांचे कडून वार्षिक ५०० रू.घेतो.रहिवासी इमारती सोडून १५०० ते २०००/- ने वाढ केली तर ,काय हरकत आहे.

मा.सभापती साहेब :- या सभेमध्ये आपण करामध्ये वाढ करू शकत नाही.मग काय उपयोग , करामध्ये वाढ करता येणार नाही.मग दिवस कशाला वाया घालवयाचा,फक्त सदस्यांचे काय मत आहेत ते पाहू पुढचा जो सभापती असेल त्यांना फसवू नका, ठराविक मुद्यांवर आम्ही बोलतो. शहराच्या सर्वागीण विकासावरच बोलतो,बजेट मंजूर झाले कि नाही सर्व सदस्यांना विचारून सांगणार,मा.महापौर ,मा.उपमहापौर,मा.स्थायी समिती निधी तुरतुद सुचविता येईल का?

अर्थ विभाग श्री.अनिल लोंढे :- पान नं.४४वरील मा.महापौर शहर विकास निधी १ कोटी,मा.उपमहापौर शहर विकास निधी ५० लाख ,मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी रू.५० लाख,मा.सभापती ,महिला व बाल विकास निधी रू.१५ लाख ,मा.उप-सभापती महिला व बाल कल्याण निधी रू.१० लाख ही मागील वर्षी तरतुद केलेली आहे.या वर्षी रू."० "'शुन्य तरतुद आहे.

मा.सभापती साहेब :- अतिरिक्त चटई क्षेत्र या लेखाशिर्षामध्ये रक्क्म रू.१ कोटींनी वाढ करण्यात यावी.विकास योजना GIS Based सुधारीत करणे (अमृत १५ वा वित्त आयोग / विकास भार किंवा वैशिष्टयपूर्ण इ.योजना) या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रूपये २ कोटींनी वाढ करण्यात यावी.मा.महापौर शहर विकास निधी २ कोटी ५० लाख ,मा.उपमहापौर शहर विकास निधी १ कोटी ५० लाख ,मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी रू.१ कोटी करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- पुतळे बसविणे १ कोटी ऐवजी २ कोटी ५० लाख तरतुद करा.महात्मा ज्योतीबा फुले यांचा पुर्णाकृती पुतळा करा या पुतळया शेजारी सावित्रीबाई फुले यांच्या पुर्णाकृती पुतळया साठी जागा तशीच ठेवा.पुतळयाचा खर्च रोखीतुन करा.छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळयाचे बॅकराउंड मंजूर करा.

मा.आयुक्त साहेब :- चारही पुतळयांचा खर्च रोखीतुन करू.

मा.सभापती साहेब :- सुशोभिकरणाचे बॅकराउंड चे काम झाल्यानंतर ते स्वच्छ करायला सोपे व सफाईला जमले पाहिजे.प्रस्ताव लगेच तयार करा.सर्व पुतळयांचा खर्च रोखीतुन करा.पुतळा उभारणी चे काम कोणत्याही परिस्थीतीमध्ये बंद पडता कामा नये. लोकशाहीर आण्णा भाउ साठे,विर लहुजी वस्ताद,सिध्दीबागेतील भगवान गौतमबुध्द या पुतळयांचे सुशोभिकरण करणे साठी लेखाशिर्षामध्ये पैसे शिल्लक ठेवा.

मा.श्री.राहुल कांबळे :- केडगांव मध्ये पुतळयांचे सुशोभिकरण करण्यात करीता तरतुद करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- माजी महापौर बाबासाहेब वाकळे तसेच सदस्य,स्थायी समिती मा.श्री.रविंद्र बारस्कर यांनी दिलेल्या पत्रा नुसार सावेडी गावठाण मधील एन.सी.सी.कार्यालयाच्या जागेत महानगरपालिकेचे कॉम्प्लेक्स किंवा हॉस्पीटल चे बांधणे करीता शहर अभियांता व नगररचनाकार,मार्केट विभाग प्रमुख यांनी समन्वय साधून संयक्त पणे अहवाल सादर करावा.

मा.सभापती साहेब :- मा.श्री.राहुल कांबळे यांचे सुचनेनुसार केडगांव मधील पुतळयांसाठी १५ ते २० लाखांची तरतुद करण्यात यावी.

मा.श्री.विनीत पाउुलबुधे :- नगरपालिका असतांना आंबेडकर स्मारकाची उभारणी करण्यात आली.सध्या या स्मारकाची दुर्दशा झाली आहे.आंबेडकर स्मारकासाठी स्वतंत्र लेखाशिर्षा ठेवावे . या ठिकाणी सुसज्य ग्रंथालय त्या ठिकाणी उभारावे.सार्वजनीक वापरासाठी स्मारकाची देखभाल दुरूस्ती कशी करता येईल अशी चळवळीतील लोकांची अपेक्षा आहे.त्या साठी आपण तरतुद केली का?

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- आंबेडकर स्मारक संदर्भात मधल्या काही काळात खर्च केला.मा.आयुक्त व आम्ही त्या ठिकाणी समक्ष पाहणी केली. तात्पुरती साफ सफाई केली.पुर्ण इमारतीची दुरूस्ती करण्याचे अंदाजपत्रक तयार केले आहे. इमारत दुरूस्ती या हेडवर तरतुद सुचविली आहे.हे सर्व साधारण हेड आहे.

मा.श्री.विनीत पाउुलबुधे :- स्मारकासाठी स्वतंत्र्य तरतुद करा.मा.शासनाकडून निधी उपलब्ध करून स्मारकामध्ये चांगले ग्रंथालय उभारावे अशी माझी सुचना करतो.२५ लाख तरतुद करावी.

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- मा.स्थायी समितीने ठराव केला तर प्रशासन त्याची अंमलबजावणी करील.

मा.श्री.विनीत पाउुलबुधे :- प्रत्येक झोनला एक अग्निशमन गाडी खरेदी करावी अशी मी सुचना करतो.

मा.सभापती साहेब :- प्रत्येक झोनासाठी अग्निशमन वाहन खरेदीसाठी तरतुद करून ठेवा.

मा.सभापती साहेब :- . सावेडी गांवठाणातील महानगरपलिकेच्या एन.सी.सी.ऑफिस करीता जागा दिलेली आहे. या जागेचे क्षेत्रफळ किती आहे.

सहाय्यक संचालक नगररचना श्री.चारठाणकर :- २१ गुंठे जागा आहे.एन.सी.सी.ऑफिस करीता जागा दिलेली आहे.

मार्केट विभाग प्रमुख श्री.सोनवणे :- एन.सी.सी.ऑफिसला दिलेल्या जागेचे भाडे कराराची मुदत संपलेली आहे.

मा.सभापती साहेब :- ती इमारत महानगरपालिकेने ताब्यात घ्यावी.माजी महापौर श्री.बाबासाहेब वाकळे व विदयमान स्थायी समितीचे सदस्य मा.श्री.रविंद्र बारस्कर यांनी सदर जागा ताब्यात घेतल्यानंतर या ठिकाणी शॅपींग कॉम्प्लेक्स बांधणे बाबत मागणी केली आहे.

या करीता मार्केट विभाग यांनी त्यांच्या कडे असलेली फाईल नगररचना विभागाकडे देवून पुढील कार्यवाही करावी.

मा.श्री.सचिन शिंदे :- मा.महापौर चषक तरतुदी मध्ये वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- मा.महापौर चषक तरतुदी मध्ये वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :-एन.सी.सी.कार्यालयाची जागा रिकामी करण्याकरीता काय कार्यवाही करणार आहे.

मार्केट विभाग प्रमुख श्री.सोनवणे :- नोटीस काढावी लागेल.सदर खोल्या सरकारी कार्यालयास दिल्या असल्याने महानगरपालिकेच्या विधी तज्ञांचे अभिप्राय घेवून पुढील कार्यवाही करतो.

मा.अतिरीक्त आयुक्त श्री. पठारे :- सदर खोल्या सरकारी कार्यालयास दिल्या असल्याने त्यांना पर्यायी जागा सुचवावी लागेल.

मा.सभापती साहेब :- या खोल्यांना भाडे कीती आहे.?

मार्केट विभाग प्रमुख श्री.सोनवणे :- ८२ हजार रूपये भाडे आहे व त्यांच्या कडे ३५लाख रूपये भाडे थकीत आहे.

मा.सभापती साहेब :- पर्यायी जागा कोणती देता येईल.

मा.श्री.गणेश कवडे :- मनपाच्या ब-याच शाळामधील खोल्या रिकाम्या असल्याने त्यांना त्या खोल्या उपलब्ध करून देण्यात याव्यात.

मा.सभापती साहेब :-एन.सी.सी.ऑफिसला पर्यायी जागा देता येईल अशा कोणत्या जागा आपल्याकडे उपलब्ध आहेत.या बाबत नगररचनाकार यांनी माहिती दयावी.

सहाय्यक संचालक नगररचना विभाग श्री.चारठाणकर :- बांधकाम केलेल्या महानगरपालिकेच्या कोणत्याही जागा उपलब्ध नाही.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- शिक्षण मंडळाचे अधिकारी,पटसंख्या नसलेली महानगरपालिकेची एखादी शाळा आहे का?

शिक्षण मंडळ,श्री.पठाण :- झेंडीगेट येथील शाळा आहे.

मा.सभापती साहेब :- उपायुक्त साहेब, कसे करता येईल सांगा.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- मी या कार्यालयाची मिटींग घेवून आपल्याला पुढील सभेमध्ये या बाबतची माहिती सांगतो.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- आपण त्यांना दोन -तीन जागा सुचविल्यास त्यापैकी एखादी जागा ते निश्चीत करतील.या कार्यालयाकडील थकबाकी बाबत व जागा रिकामी करणे बाबत पत्र व्यवहार करा.

मा.आयुक्त साहेब :- त्यांना पर्यायी जागा सुचवू ,जुन्या कलेक्टर ऑफिस मध्ये जागा असेल तर सुचवू.

मा.सभापती साहेब :- नोटीस दया, महानगरपालिकेच्या पॅनल वरील वकीला पैकी एकावर जागा रिकामी करणे बाबत कार्यवाहीची जबाबदारी सोपवा.सहाय्यक संचालक नगररचना श्री.चारठाणकर साहेब ,शहर अभियंता श्री.इथापे साहेब यांनी एकत्रीत बसून लवकरात लवकर प्रस्ताव तयार करा.

मा.सभापती साहेब :- फेज-२ मध्ये नविन लाईनवर कनेक्शन स्थलांतरीत करणे या लेखाशिर्षा अंतर्गत माझ्या प्रभागात १२५ कनेक्शन झाले आहेत.नविन हद्दवाढीत ज्या पाईप लाईन करावयाच्या त्या साठी महानगरपालिकेकडे निधी नाही.आमची मागणी आहे की, या कामासाठी ७० लाख रूपये ची तरतुद कॅश करण्यात यावी.पाणी पुरवठया करीता लाईन टाकण्याचे काम पुर्णत्वास आले आहे.सदर कामाचे नकाशे ,पाईप लाईन टाकण्याचे नकाशे हे सुमारे आठ ते दहा वर्षापुर्वी तयार केलेले असून सध्या उपनगरामध्ये नविन कॉलनी व अपार्टमेंट वाढत असून त्यांना पाणी देणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे.या योजनेतील पैसे संपल्याने व काम संपल्याने ठेकेदार सदर ठिकाणी काम करीत नाही.त्यामुळे या मध्ये २ कोटीची वाढ करण्यात यावी.त्यातील ७० लाख रूपये पाणी पुरवठा विषयक अत्यावश्यक काम असल्याने केलेल्या कामाचे बील तात्काळ अदा करण्यात यावे.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- दोन कोटी करा.

मा.आयुक्त साहेब :- पाणी पुरवठा ही अत्यावश्यक सेवा असल्याने या बाबतची बिले टप्या टप्याने अदा करण्यात येतील.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- उपनगरामध्ये लोकवस्ती वाढत असल्याने अनेक ठिकाणी पोल नाहीत तसेच अनेक ठिकाणी दोन पोल मध्ये अंतर जास्त आहे. गेल्या दोन ते तीन वर्षापासुन नविन पोलचे प्रस्ताव मंजूर होत नाहीत.तसेच.त्या ठिकाणी इलेक्ट्रीक पोलची मागणी वाढत आहे.नविन पोल उभरणे व फिटींग साठी या करीता लेखाशिर्षा मध्ये रू.५० लक्ष तरतुद ठेवली आहे.यामध्ये वाढ करावी व तरतुद कॅश ठेवावी.

मा.सभापती साहेब :- रक्तपेढी साठी ६६ लाख तरतुद केली आहे., हा खर्च कशावर केला जातो.

रक्तपेढी विभाग प्रमुख डॉ.शेडाळे :- मानधनावर कर्मचारी नेमलेले आहेत.त्याचे वेतना करीताचा खर्च दर्शविलेला आहे.रक्तपेढी करीता ४ लॅब टेक्नीशीयन ,१ पी.आर.ओ. स्टाफ नर्स यांच्या नियुक्त्या हया ,अन्न औषध प्रशासन यांच्या नियामानुसार पदे भरणे गरजेचे आहे.

मा.सभापती साहेब :- ब्लड बॅग किती संकलन व वितरण झाले आहे.

रक्तपेढी विभाग प्रमुख डॉ.शेडाळे :- ५०० ब्लड बॅगचे संकलन व वितरण झाले आहे

मा.सभापती साहेब :- एका वर्षा ५०० बॅग म्हणजे दर रोज १ बॅग जाते. त्या पेक्षा रक्त पेढी बंद करा व एखादया संस्थेला चालवायला दया.

रक्तपेढी विभाग प्रमुख डॉ.शेडाळे :- पदे भरली नाही तर अन्न औषध प्रशासन परवानगी देणार नाही.

मा.सभापती साहेब :- ३५० रू.आपण बॅग घेतो,डोनर नसेल तर ५०० रू घेतो सदर बाबत येणारा खर्च महानगरपालिकेने भागवावा व ब्लड बॅग फ्री दया, महानगरपालिकेच्या हद्दीतील रूग्णांना ब्लड बॅग फ्री करा तसे देता येत नसेल तर नाममात्र १ रू.फि घ्या.

वैद्यकीय अधिक्षक डॉ.राजूरकर:- गर्व्हरमेंट रेट इतके रेट घेतले पाहिजेत.रेट गव्हरमेंटने ठरविले आहेत.आपण फ्री आपण देवू शकत नाही.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- रक्त संकलनाकरीता जनजागृतीचे काम करा.कॅम्प घ्या.तुम्ही काम करत नाही.आहे ती यंत्रणा चांगली राबवा.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- प्रत्येक नगरसेवकाला संपर्क करा.महापुरूषांच्या जयंती,पुण्यतीथी च्या वेळी रक्तदान शिबीरे आयोजीत केली पाहिजे.महानगरपालिकेच्या कर्मचा-यांचे रक्तदान शिबीर आयोजीत करा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- एखादी थीम राबवा.पी.आर.ओ.ला रेषो ठरवून दया.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.राजूरकरः- संकलन वाढवावयाचे आहे.सर्वानी सुचविले त्या नुसार नियोजन करू.आपल्या कडे डिमांड येत नाही.सर्व्हीस आपल्या स्टाफ मार्फत करावी लागेल.खाजगी रक्तपेढी वाले हॉस्पीटलमध्ये जावून सॅम्पल घेवून जातात,ब्लड बॅग स्वतः नेवून देतात. सर्व्हीस देत असल्याने आपल्याला डिमांड येत नाही.आपल्याला सुध्दा ही सर्व्हीस दयावी लागेल.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ब्लड बॅकेतील कर्मचा-यांची डयुटी काय असते.

वैद्यकीय अधिक्षक डॉ.राजूरकरः- स्टोअरेज चेक करणे,टेंपरेचर पहाणे ,रक्तपेढीतील काम पहाणे,कॅम्प घेणे इत्यादी काम करतात.

मा.सभापती साहेब :- एक रू.नाममात्र घेवून उर्वरीत रक्क्म रू.३५०/- देतो ते महानगरपालिका भरेल.लोकांना सेवा मोफत देवू.डोनर आणा व ब्लड फ्रि घेवून जा.ही योजना राबविण्या यावी.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- ब्लड बॅक सुरू होवून सहा महिने झाले आहे.या सहा महिन्यात एखादया गोष्टीवर निर्णय घेवू नका, सहा महिने कामाची प्रगती पाहू त्या नंतर निर्णय घेणे योग्य होईल.

मा.सभापती साहेब :- केअर टेकर मार्फत पॅम्प्लेट वाटा.घंटागाडी मार्फत प्रसिध्दी दया.डोनर दया व ब्लडबॅग फ्री न्या.रक्तसंक्रमण परिषद या संस्थेला फोन लावून विचारा आम्ही मोफत ब्लड देवू शकतो का?

मा.श्री.गणेश कवडे :- यापुर्वी आपण अमरधाममध्ये अंत्यविधी साहीत्याची सुविधा मोफत पुरविली आहे.त्या धर्तीवर आपल्याला करता येईल.

मा.सभापती साहेब :- आपण ब्लड बॅग फ्रि दिल्यावर कायदा मोडतो का ते सांगा .जे शहराच्या बाहेरील नागरीक आहेत त्यांना रू.३५०/- व रू. ५००/- दर ठेवा.तीन महिने अगोदर राबवा.

वैद्यकीय अधिक्षक डॉ.राजूरकरः- आता फक्त होल ब्लड देतो.पुर्ण क्षमतेने चालू झाल्यानंतर इतर घटक देण्याची सुविधा देता येईल., मोफत सुविधा सुरू केल्यास इमर्जन्सी डिमांड आल्यानंतर वाद होतील,सिस्टीम कॉम्प्लीकेटेड होईल.आपलेच फोन येतील.

मा.सभापती साहेब :- डोनर आणला तर त्याला फ्रि, डोनर नसला तर रू.१००/- घेवू महानगरपालिका हद्दीबाहेरील नागरीकांना पुर्वीचेच दर ठेवा.

मा.सभापती साहेब :- सर्व सदस्यांची चर्चा करून ,उपस्थीत सर्व अधिकारी ,सर्व सिस्टीमशी चर्चा करून महानगरपालिकेच्या ब्लड बॅक मध्ये रक्तदाता जर घेवून आला तर एक बॅग मोफत व डोनर घेवून आला नाही तर रू.१००/- फि आकारून देण्यात यावी.रूग्णाचे आधारकार्ड पाहून तो महानगरपालिका हद्दीतील रहीवासी असेल तर त्याला लाभ देण्यात यावा.हद्दीबाहेरील रूग्णांना जुन्या दराने देण्यात यावे.

मा.श्री.गणेश कवडे :- डोनर दिला नाही तर रक्त कोठून उपलब्ध होणार,डोनर घेवून आला,त्याने कोणत्याही ग्रुपचा डोनर आणला तर रक्त उपलब्ध होईल का?

वैद्यकीय अधिक्षक श्री.राजुरकर :- उपलब्धते नुसार देण्यात येईल.

मा.सभापती साहेब :- रक्तपेढीतील पी.आर.ओ.यांनी सर्व नगरसेवक,तरूण मंडळे,सामाजीक संस्था यांचेशी संपर्क साधून मोठया प्रमाणावर कॅम्प आयोजीत करावेत प्रत्येक प्रभागामध्ये कॅम्प आयोजीत करण्या करीता प्रोत्साहीत करावे.पुरस्कार दयावेत.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- ब्लड डोनर व्हॉन ,नविन शव वाहीनी,ॲम्बुलन्स साठी प्रत्येकी रू.५ लाखाची तरतुद करा.

मा.सभापती साहेब :- नगरसेवक निधी प्रत्येक नगरसेवकाला रू.१० लाख तरतुद करण्यात यावी.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- नगरसेवक निधी रोख करा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- नगरसेवक निधी व वॉर्ड विकास निधी प्रत्येकी ५ लाख रोख तरतुद करा.

मा.आयुक्त साहेब :- रक्कम रूपये ५ लाख रूपये रोख करू.

मा.सभापती साहेब :- ७ लाख रूपये कॅश करा.

मा.आयुक्त साहेब :- ठिक आहे.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- आम्ही प्रभागात पाणी पुरवठयाचे एमर्जन्सी काम करून घेतो.त्या केलेल्या कामाचे ठेकेदाराचे बील वेळेवर दिले जात नाही.त्यामुळे तो पुन्हा काम करण्यास तयार होत नाही.या करीता आत्यावश्यक सेवेतील कामांसाठी रोखीची तरतुद करण्यात यावी.

मा.आयुक्त साहेब :- रिपेअरींगची बीले आपण दिली आहेत.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२१-२०२२ चे सुधारित व सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करीत आहे. मा. महानगरपालिका सभे पुढे सर्वानुमते सादर करण्यांत यावे.

पुढील वेळी १९ फेबुवारी च्या आत सभा आयोजीत करावी.प्रशासनाने चांगले आंदाजप्रत्रक केलेआहे.उपस्थीतांचे आभार.

**ठराव :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०२१-२०२२ चे सुधारित व सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभे समोर पाहिले.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२१-२०२२ चे सुधारित व सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करीत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२१-२०२२ चे सुधारित व सन २०२२-२०२३ चे सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेप्रमाणे (**सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये** ) दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा खर्चाच्या रकमा फेरफार करणेस तसेच नागरिकांना महत्वपूर्ण नागरी सुविधा देण्यासाठी आवश्यक ती तरतुद करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देणे बाबत शिफारस करीत आहे.

**तसेच**

*रिव्हीजन करणे करीता सध्या ई - निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे.ठेकेदार संस्थेकडून रिव्हीजन पुर्ण झाल्यावर म.न.पा.हद्दीमधील ज्या मालमत्ता धारकांना कर आकारणी झालेली नाही त्या सर्व मालमत्ता धारकांना कराची नव्याने आकारणी होणार असल्याने " **सर्वसाधारण कर**" या लेखाशिर्षा अंतर्गत रूपये १ कोटी ६५ लक्ष रूपयांनी वाढ सचविण्यात येत आहे.

* शहरातील इमारतींच्या संख्येमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. त्या दृष्टीने अग्नीशमन विभागाकडील **"ना हरकत प्रमाणपत्र "** या लेखाशिर्षा मध्ये रू.२० लाखांनी वाढ करण्यात यावी.,

*"**मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाई** "या लेखाशिर्षा अंतर्गत रू.५० लाखाची वाढ करण्यात यावी.

* प्रत्येक झोनासाठी अग्निशमन वाहन खरेदी करणे कामी "**अग्निशमन वाहन खरेदी** "'या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये ५० लाखाने वाढ करण्यात यावी.

* अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे येथील रक्तपेढी मध्ये रक्तदाता (डोनर) असल्यास ब्लड बॅग मोफत देण्यात यावी. तसेच रक्तदाता (डोनर)नसल्यास प्रति बॅग रू.१००/- फि आकारणी करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

* चितळे रोड येथील नेहरू मार्केटच्या ठिकाणी अदयावत शॉपिंग कॉम्प्लेक्स व भाजी मार्केट करीता वित्तीय संस्था /बॅकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी /बी.ओ.टी तत्वावर बांधकाम करण्याचा प्रस्ताव तात्काळ सादर करावा.

* सावेडी गांवठाण येथील महानगरपालिकेच्या शॉपींग सेंटर (एन.सी.सी.कार्या .) या ठिकाणी अदयावत शॉपिंग कॉम्प्लेक्स करीता वित्तीय संस्था /बॅकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी /बी.ओ.टी तत्वावर प्रस्ताव सादर करण्यात यावेत.

* "**अनाधिकृत बांधकाम नियमानुकुल करणे** "या लेखाशिर्षा मध्ये मागील तीन वर्षा मधील उत्पन्न पहाता या रू.२ कोटी ने वाढ सुचविण्यात येत आहे.

*"**नळधारकाकडून जमा पाणीपट्टी**" या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये २ कोटीने वाढ करण्यात यावी.

*. "**मालमत्ता नांव नोंदणी फि** "या लेखाशिर्षा मध्ये नविन घरांना घरपटटी लागु करणे बाबत पाठपुरावा करून मालमत्ता धारकांच्या प्रॉपर्टी ज्यांची महानगरपालिकेकडे नोंद नाहीत. अशा प्रॉपर्टींची नव्याने वाढ होवून होणार आसल्याने रू.५० लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

* **"जाहिरात बोर्ड जागा भाडे "** या लेखाशिर्षाअंतर्गत जाहिरात बोर्ड बाबत राज्यसरकारने केलेल्या नियमांची अंमलबजावणी करून आकारणी दराची नियमावली लागु झाल्यानंतर या उत्पन्नमध्ये वाढ होणार असलयाने या लेखाशिर्षामध्ये रक्कम रूपये ५० लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी.

* अहमदनगर महानगरपालिकेचे चार प्रभाग समिती कार्यालय व बेल्हेगांव,नागापुर व केडगांव येथील उप कार्यालय या कार्यालयातील कामकाजावर नियंत्रण ठेवणे कामी सी.सी.टि.व्ही.कॅमेरे बसविण्यात यावेत व येथील कामकाज पहाणे करीता मुख्यकार्यालयातील मा.महापौर ,मा.आयुक्तसाहेब यांच्या दालनामध्ये तसेच नागरीकांना पहाण्या करीता पॅसेज मध्ये एकुण तीन स्क्रीन बसविण्यात याव्यात या करीता **"नविन संगणक,संगणक साहित्य,हार्डवेअर,सॉपटवेअर खरेदी "** या लेखाशिर्ष अंतर्गत रक्कम रूपये ४० लक्ष दर्शविण्यात यावी.

* म.न.पा.हद्दीमध्ये गॅस कंपनी मार्फत घरगुती गॅस पाईप लाईन टाकण्याचे काम लवकरच सुरू होणार असल्याने तसेच केबल टाकणे, पाण्याची लाईन टाकणे व दुरूस्त करणे, ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती करता रस्ता फोडणे करिता शुल्क आकारले जाते त्यामुळे**" रस्ता फोडणे, जोडणे वसुली व बांधकाम इतर"** या लेखाशिर्षा मध्ये रूपये ३ कोटी रूपयांनी वाढ करण्यात यावी.

*मा.शासनाने पारित केलेल्या जी.आर.नुसार व एफ.एस.आय.देणे करीता **"अतिरीक्त चटई क्षेत्रे निर्देशांक पोटी प्रिमियम "**या लेखाशिर्षा मध्ये रू.१ कोटीने वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

* **" विकास भार निधीतुन खर्च "** या लेखाशिर्षाअंतर्गत रू.१ कोटी ५० लाखाने वाढ करण्यात यावी.

* **" बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा "** या लेखाशिर्षा मध्ये रू. १० लाख रूपयांनी वाढ करावी.

* **"रेखांकनमधील अंतर्गत सुधारणा (ले आउट धारक ) "** या लेखाशिर्षामध्ये रू.१ कोटीने सुचविण्यात येत आहे.

* हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनावर बसलेला ब्रांझ धातुचा पुतळा तयार करून महानगरपालिकेच्या नविन प्रशासकिय इमारती समोरील जागेत नियोजित चबुत-यावर बसविणे बाबतची निविदा मा.स्थायी समिती मध्ये निविदा मंजूर झालेली असून या कामा करीता रक्कम रूपये १ कोटी ५० लाखांची वाढ **"पुतळे बसविणे "**या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावी.एकुण रक्कम रू.३ कोटी १० लक्ष दर्शविण्यात यावी.तसेच राष्ट्रपुरूष महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुर्णाकृती पुतळा माळीवाडा वेशीमध्ये बसविण्यात यावा.,महापुरूष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा मार्केट यार्ड चौकामध्ये बसविण्यात यावा,छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा सावेडी भागातील प्रोफेसर चौक येथे बसविण्यात यावा या कामा करीता येणारा खर्च **"पुतळे बसविणे"** या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावा.

* लोकशाहीर आण्णभाउ साठे ,विर लहुजी वस्ताद तसेच केडगांव येथील महात्मा ज्योतीबा फुले , भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व सिध्दीबाग येथील भगवान गौतमबुध्द या सर्व पुतळयांच्या देखभाल करणे करीता **"पुतळे देखभाल"** या नविन लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये २५ लाखांची तरतुद करण्यात यावी.

*शहर व उपनगररामध्ये **"नविन इलेक्ट्रीक पोल बसविणे"** या लेखाशिर्षा अंतर्गत २५ लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे.

*अनाधिकृत नळ कनेक्शन ची शोध मोहीम हाती घेवून उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी. **"अनाधिकृत नळ निमानुकुल करणे "**या बाबत योजना जाहिर करण्यात यावी.यास्तव या लेखाशिर्षाअंतर्गत रू.१ कोटीची वाढ करण्यात यावी.

* **"पाणी विक्री जमा "**या लेखाशिर्षा मध्ये रू.५० लाख ने वाढ करण्यात यावी.

*महानगरपालिकेची रक्तपेढी अदयावत करणे करीता ब्लड डोनर व्हॅन खरेदी करणे करीता रक्कम रूपये ४० लाखांची तरतुद करण्यात यावी.

* **"मा.सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी"** या लेखाशिर्षा अंतर्गत झालेल्या कामाचे रक्कम रू.७ लाखापर्यतची देयके अर्थ विभागाकडे प्राप्त झाल्या नंतर ती तात्काळ अदा करण्यात यावी.

***मा.महापौर शहर विकास निधी** रू.२ कोटी ५० लाख, **"मा.उपमहापौर शहर विकास निधी "**रू.१ कोटी ५०लाख, **"मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी"** रू.१ कोटीची तरतुद दर्शविण्यात यावी.

* "**मा.महापौर चषक या लेखाशिर्षा** "मध्ये रक्कम रूपये ५ लाखाने वाढ करण्यात यावी.

*"**क्रीडांगणे विकसीत करणे**" या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये ५ लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

* अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग क्र.७मधील कब्रस्तान विकसीत करणे करीता मा.शासनाकडून प्राप्त **"अल्पसंख्यांक बहुल क्षेत्र निधी "** या लेखाशिर्षा अंतर्गत रककम रूपये २० लाखांची कामे या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावीत.

* विकास योजना जी.आय.एस. (GIS Based) तयार करणे मा.शासनाच्या निर्देशानुसार काम होणे अत्यंत गरजेचे असल्याने या लेखाशिर्षा अंतरर्गत सन २०२१ -२२ करीता रक्कम रू. १ कोटी ने तरतुदी मध्ये वाढ करून , सन २०२१-२२ मधील भविष्य निर्वाह निधी तुट या लेखाशिर्षातील ५१ लाख ५० हजार व रस्ते,इमारतीवरील वीज बील या लेखाशिर्षातील ५० लाख तरतुद कमी करण्यात यावी.तसेच सन २०२२-२३ या आर्थिक वर्षा करीता अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील महानगरपालिकेच्या सर्व जागांची व इतर शासकिय विभागांच्या मालकीच्या जागांचे ई.टी.एस./डी.जी.पी.एस.मशीन व्दारे कंटुर सह सर्व्हेक्षण करणे मिळकतीच्या हद्दीवर ३०.०० मीटर अंतराने कॉक्ट्रीट दगड बसवून डिमार्केशन करून हद्द कायम करून महानगरपालिकेच्या मालकी दर्शविणारे उपलब्ध दस्तावेज, ७/१२,जागेचे सर्व्हेक्षण ,कंटुर नकाशे महानगरपालिकेस सादर करणे या कामी येणारा खर्च रक्कम रूपये २ कोटी ची वाढ करण्यात यावी.सदरचा खर्च अमृत योजना , १५ वा वित्त आयोग / विकास भार निधी किंवा वैशिष्टपुर्ण योजने अंतर्गत भागविण्यात यावा.

* प्रभाक क्र.६ मधील सावेडी गांवठाण मधील विठ्ठल मंदिर ते खांडरे घर ते सावेडी वेस पर्यतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे करीता रक्कम रूपये ४५ लाखांची तरतुद करण्यात यावी.सदर कामाकरीता "नविन रस्ते विकसीत करणे "या लेखाशिर्षा अंतर्गत खर्च भागाविण्यात यावा.

* प्रभाग क्र.७ बोल्हेगांव मधील मारूतीराव घुले कॉलेज मुख्य रस्ता ते सुभाष कातोरे घर ते उमेश भोईटे यांच्या घरापर्यतचा रस्ता मजबुती करणासह कॉक्रीटीकरणक करणे या कामा करीता रू.२५ लक्ष खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "** या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यांत यावा.

*प्रभाग क्र.७ मधील गांधीनगर,बोल्हेगांव रोड ते खार ओढयापर्यत ९०० एम.एम.व्यासाची बंदपाईप गटर लाईन टाकणे या कामा करीता रू.१६ लक्ष खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "** या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावा.

* **"वाढीव हद्दीतील पाईपलाईन टाकणे "**या लेखाशिर्षामध्ये रू.७० लाख वाढ करण्यात यावी.

* अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग समिती क्र.१ अंतर्गत असलेले नागापुर - बोल्हेगांव उप कार्यालयाची इमारत पाडून नविन कार्यालयीन इमारत बोल्हेगांव गांवठाण येथे बांधणे या कामा करीता रू.१८ लक्ष खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "**या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावा.
* प्रभाग क्र. १० मधिल मध्ये रामवाडी कोपरा ते जलालशहा कब्रस्तान ते एम.जे.पी.ऑफिस पर्यतचा रस्त्याचे साईड पट्टी व पेव्हींग ब्लॉक बसविणे करीता रू.२५लाखचा खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "** या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यंत यावा.
*प्रभाग क्रमांक ०७बोल्हेगांव गावठांण अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे करीता रू.३०लक्ष खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे"**या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावा.
* प्रभाग क्रमांक ०७ मधील संत तुकाराम महाराज उद्यान व जॉगींग ट्रॅक विकसीत करणे करीता अंदाजीत रक्कम रूपये ३०लाख**"विकास भार निधी"**या लेखाशिर्षा अंतर्गत जमा होणा-या रकमेतुन भागविण्यात यावा.
*प्रभाग क्र.७ जिल्हापरिषद शाळा बोल्हेगांव गावठांण ते केशव कॉर्नर रस्ता मजबुतीसह डांबरीकरण करणे करीता रू.३० लक्ष खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "** या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यांत यावा.
* प्रभाग क्रमांक ११ मधिल कानडे मळा भागातील बोरा क्लीनीक ते गोवर्धन अपाटर्मेंट ते सर्व मंगल कार्यालय ते पुंड किराणा ते सुंबे घरापर्यत रस्ता मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे रू.२० लाखाचा खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "**या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावा.
* प्रभाग क्रमांक १७ मधील कांबळे मळा येथील पोलीस चौकी पासून ते पोलीस पाटील यांचे घरा पर्यत रस्ता डांबरीकरण करणे व या रस्त्यावरील ओढयावरील पुलाची दूरूस्ती करणे या कामा करीता रक्कम रूपये ४५ लाख **"नविन रस्ते विकसीत करणे "**या लेखाशिर्षा अंतर्गत खर्च भागाविण्यात यावा.
* महानगरपालिकेच्या मालकीचे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक या ठिकाणी सुसज्य ग्रंथालय उभारावे व स्मारकाची देखभाल दुरूस्ती सदरचा खर्च **"इमारत दुरूस्ती या लेखाशिर्षा"** अंतर्गत करण्यात यावा. या कामा करीता रक्क्म रूपये २५ लाखांची तरतुद मध्ये वाढ करण्यात यावी.
***"सामाजिक संस्थांना देणगी"** या लेखाशिर्षामध्ये रूपये ५ लाख तरतूद दर्शविण्यात यावी. रसिक ग्रुप,अ.नगर व नगर जल्लेष (ट्रस्ट) अ,नगर व इतर सामाजिक संस्थांना मागणी पत्रानुसार अनुक्रमे रूपये
१लाख ५० हजार देणगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे. याबाबत संबंधीत संस्थाकडून कागदपत्राची पुर्तता करून प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी. सदरचा खर्च **सामाजिक संस्थांना देणगी** या लेखाशिर्षातंर्गत करण्यात यावा.
* शहरातील प्रमुख चौक सुशोभिकरण करण्याच्या दृष्टिने खाजगी संस्था,सामाजिक संस्था,यांचे मार्फत कार्यवाही करण्यात यावी तसेच शहरातील प्रमुख रस्त्यावरील डिव्हायडर सुशोभिकरण करणे देखील आवश्यक असून त्यामुळे परिसर देखील सुशोभित होईल या करिता डिव्हायडर सुशोभिकरण खाजगी संस्था,कंपनी,सामाजिक संस्था यांना या कामी प्रवृत्त करण्यात यावे व त्यांचे मार्फत सुशोभिकरणास परवानगी देण्यात यावी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०२१-२०२२ चे सुधारित अंदाजपत्रकातील तरतुदींची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.

सन २०२२-२०२३ अंदाजपत्रकाच्या प्रती छापून घेवुन अहमदनगर महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरीलप्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह सन २०२१-२०२२ चे सुधारित व सन २०२२-२०२३ सालचे बाबवार अंदाजपत्रकास मान्यता व शिफारशी सह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

ही अर्थसंकल्पावर शिफारशी करण्याकरीताची सभा असल्याने या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता या सभेतील ठरावानुसार कार्यवाही करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख

ठराव सर्वानुमते मंजूर.

( मा.श्री.कुमार बबनराव वाकळे )
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**सोबत** :- सन २०२१-२०२२ चे सुधारित व सन २०२२-२३ सालचे मुळ अंदाजपत्रकामध्ये केलेल्या बदलांचा तक्ता

| अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मा. सर्वसाधारण सभेने मंजूर केलेला सन २०२१-२०२२ चा अर्थसंकल्प (आकडे लाखात) | | | | | |
| | | | | | |
| सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०२१)........................................४५८.९६ | | | | | |
| एकुण जमा..................................................................... ६८६६३.८० | | | | | |
| सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा............................................... ६९१२२.७६ | | | | | |
| एकुण खर्च...................................................................... ६८७३९.७४ | | | | | |
| अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०२२)................................... ३८३.०२ | | | | | |
| अ. नं. | **लेखाशिर्ष (खर्च बाजू) सन २०२१-२२** | मा.स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद | सर्वसाधारण सभेने केलेला बदल | | मा.सर्वसाधारण सभेने मंजुर केलेली तरतूद |
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | विकास योजना GIS Based सुधारीत करणे (अमृत १५ वा वित्त आयोक/विकास भार किंवा वैशिष्टपुर्ण इ.योजना) | ६००.०० | १००.०० | | ७००.०० |
| २ | आकस्मिक खर्च (सा.प्र.वि.) | ३.०० | १.५० | | ४.५० |
| ३ | भविष्य निर्वाह निधी तूट | १००.०० | | ५१.५० | ४८.५० |
| ४ | रस्ते व इमारतीवरील विज बिल | ६४२.०० | | ५०.०० | ५९२.०० |
| | एकुण | ६०३.०० | १०१.५० | १०१.५० | ७०४.५० |

सही /-
सभापती, स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर

मा. स्थायी समितीने शिफारस केलेला सन २०२२-२०२३ चा अर्थसंकल्प (आकडे लाखात)

सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०२२)........................................ ३८३.०२

एकुण जमा.................................................................... ८१३७३.०६

सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा.............................................. ८१७५६.०८

एकुण खर्च.................................................................... ८१३९७.३१

अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०२३)................................... ३५८.७७

| अ. नं. | लेखाशिर्ष (जमा बाजू) सन २०२२-२३ | मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद | मा.स्थायी समितीने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजुर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मुंबई नर्सिंग होम ॲक्ट फी | ५.०० | १५.०० | | २०.०० |
| २ | ना हरकत प्रमाणपत्र (अग्निशमन विभाग) | ४.०० | २०.०० | | २४.०० |
| ३ | अनाधिकृत बांधकाम नियमानुकूल करणे | १००.०० | २००.०० | | ३००.०० |
| ४ | नळधारकाकडून जमा पाणीपट्टी | ४२६१.४० | १०२.०० | | ४३६३.४० |
| ५ | मालमत्ता नांव नोदणी फी | ५२१.०० | ५०.०० | | ५७१.४० |
| ६ | जाहिरात बोर्ड जागा भाडे | ६६.०० | ५०.०० | | ११६.०० |
| ७ | रस्ते फोडणे,जोडणे वसुली व बांधकाम इतर | ३०००.०० | ५००.०० | | ३५००.०० |
| ८ | अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम | १०००.०० | २००.०० | | १२००.०० |
| ९ | अमृत२/नगरोत्थान राज्यस्तार पाणी पुरवठा योजना अनुदान | ०.०० | १००००.०० | | १००००.०० |
| १० | अमृत२/नगरोत्थान राज्यस्तार पाणी पुरवठा योजना मनपा हिस्सा/कर्ज | ०.०० | ३०००.०० | | ३०००.०० |
| ११ | रेखांकन अंतर्गत सुधारणा (ले आउट धारक) | २००.०० | ५०.०० | | २५०.०० |
| १२ | बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा | ३.०० | ४७.०० | | ५०.०० |
| १३ | विकास भार निधी | ८००.०० | १५०.०० | | ९५०.०० |
| १४ | अनाधिकृत नळ नियमानुकूल करणे | ३५२.०० | १००.०० | | ४५२.०० |
| १५ | सर्वसाधारण कर | ८०८०.०० | ३००.०० | | ८३८०.०० |
| | एकुण | १८३९३.२८ | १४७८४.०० | ०.०० | ३३१७७.२८ |

सही/-

सभापती

स्थायी समिती

| अ. नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू) सन २०२२-२३ | मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद | मा.स्थायी समितीने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजुर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | सामाजिक संस्थांना देणगी | ०.०० | १०.०० | | १०.०० |
| २ | पाणी पुरवठा साहित्य (खरेदी व रिपेअर) | १००.०० | १००.०० | | २००.०० |
| ३ | अमृत२/नगरोत्थान राज्यस्तार पाणी पुरवठा योजना अनुदान | ०.०० | १००००.०० | | १००००.०० |
| ४ | अमृत२/नगरोत्थान राज्यस्तार पाणी पुरवठा योजना मनपा हिस्सा/कर्ज | ०.०० | ३०००.०० | | ३०००.०० |
| ५ | विकास विकास निधी | ०.०० | २३२.०० | | २३२.०० |
| ६ | रेखांकन अंतर्गत सुधारणा (ले आउट धारक) | २००.०० | ५०.०० | | २५०.०० |
| ७ | बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा | ३.०० | ४७.०० | | ५०.०० |
| ८ | मा.महापौर शहर विकास निधी | ०.०० | २५०.०० | | २५०.०० |
| ९ | मा.उपमहापौर शहर विकास निधी | ०.०० | १५०.०० | | १५०.०० |
| १० | मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| ११ | मा. सभापती महिला व बाल कल्याण विकास निधी | ०.०० | १५.०० | | १५.०० |
| १२ | मा. उपसभापती महिला व बाल कल्याण विकास निधी | ०.०० | १०.०० | | १०.०० |
| १३ | मा.विरोधी पक्ष नेता शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| **१४** | मा.सभागृह नेता शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| **१५** | पुतळे बसविणे | २१०.०० | १४०.०० | | ३५०.०० |
| **१६** | अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम रक्कमेतून कामे करणे | १०००.०० | २००.०० | | १२००.०० |
| **१७** | जलशक्ती अभियान राबविणे | ०.०० | १०.०० | | १०.०० |
| **१८** | वाढीव हद्दीत पाईपलाईन टाकणे | १००.०० | ७०.०० | | १७०.०० |
| **१९** | नविन गटर | ५०.०० | | ५०.०० | ०.०० |
| **२०** | विकास भार निधी खर्च | २००.०० | ३७.५० | | २३७.५० |
| **२१** | विकास भार निधी (नगररचना भू संपादन) | ६००.०० | ११२.५० | | ७१२.५० |
| २२ | नविन इले.पोल, स्ट्रीट लाईट , स्पॅन फिटींग | ५०.०० | २५.०० | | ७५.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३ | इमारत दुरूस्ती | १२५.०० | २५.०० | | १५०.०० |
| २४ | टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणे | २००.०० | २००.०० | | ४००.०० |
| | | | | | |
| | एकुण | २८३७.०० | १४८३४.०० | ५०.०० | १७६२२.०० |

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका